# मेट्रो-३ डब्यांचे चार्जिंग सुरू

मुंबई, ता. १६ : कुलाबा-वांद्रे-सीप्झ 'मेट्रो-३'चे डबे आरेमध्ये दाखल झाले असून त्यांची जुळवणी सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसीएल) डब्यांचे उच्च दाबाने चार्जिंग सुरू केले आहे. त्यामुळे मेट्रो ३ मार्गावर या महिन्याच्या अखेरीपासून चाचण्या सुरू करण्याचे नियोजन 'एमएमआरसीएल'ने केले आहे.

मेट्रो ३ च्या कारशेड उभारण्यास आरेमध्ये वेग आला आहे. आरेतील कारशेडला पर्यावरण संघटनांकडून विरोध होत असतानाही मेट्रोच्या चाचणीची तयारी 'एमएमआरसीएल'ने सुरू केली आहे. आता आठ डब्यांचे उच्च दाबाने चार्जिंग सुरू केले आहे. यानंतर मेट्रोच्या चाचण्या घेण्यास प्रत्यक्षात सुरुवात होईल, असे एमएमआरसीएलच्या वतीने सांगण्यात आले.